बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



सामाहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०६ | बुधवार,दि.१८ जानेवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## एनएनटीआरमधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर ४ अंडरपासच्या कामाला वेग



**गोंदिया:** नवेगाव-न्यू नागझिरा व्याघ्रप्रकल्प नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गामुळे विभागला गेला आहे. या महामार्गावरून आवागमन करताना अनेक वन्यजीवांना आजवर जीव गमवावा लागला. हे अपघात टाळण्यासाठी आता चार भुयारी मार्ग तयार करण्याच्या कामाला सुरवात झाली आहे. विशेष म्हणजे या पुलांच्या मंजुरी वनविभागाने लावलेला ७-८ वर्षाचा केलेला उशीर अनेक वन्यप्राण्यांच्या जीवावर बेतला आणि जीव गमवावा लागला.मात्र सध्या राष्ट्रीय महामार्गावर साकोली ते मुंडीपार,डुग्गीपार ते देवरी आणि सिरपूर ते देवरीच्या दरम्यान या भूयारीमार्गाच्या कामांने वेग घेतला आहे ..नागझिरा-नवेगावबांध व्याघ्रप्रकल्पाचा विस्तार करताना बफर झोन तयार करण्यात आला. आजघडीला हा व्याघ्रप्रकल्प २ हजार ३३३ वर्ग किलोमीटरमध्ये पसरला आहे. वन्यजीवांकरिता आवश्यक सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. वन्यजीवांच्या रक्षणाच्या दृष्टीने जंगलातील गावांचे पुनर्वसन करण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पातून जात असल्याने दरवर्षी डझनभरापेक्षा अधिक वन्यजीवांना जीव जातो. खाद्याच्या शोधात भटकंती करीत असताना हे अपघात घडतात. वन्यजीवांच्या नेहमीच्या भटकंती मार्गावर उड्डाणपूलासह भुयारी मार्ग तयार करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. याला महामार्ग प्राधिकरणाने आधी मंजुरी दिली नाही. त्यामुळे आता वन्यजीवांचे रक्षणाकरिता भुयारी मार्ग तयार करण्याचा प्रस्ताव वन्यजीव विभागाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठविला होता,त्या प्रस्तावाला मंजुरी देण्यास एक दशकाचा अंदाजे काळ लोटला.त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर चार भुयारी मार्ग या प्रस्तावांतर्गत तयार करण्यास सुरवात झाली आहे.त्यासाठी जागा निर्धारित करून नकाशेही पाठविल्यानंतर दोन वर्ष मंजूरीसाठी लागले होते. उल्लेखनीय म्हणजे हा व्याघ्रप्रकल्प नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहामुळे दोन भागांत विभागला गेल्याने वन्यप्राण्यांना आ-पला जीव गमवावा लागतो.त्यामुळे साकोली जवळील जांभळी फाटा ते पिंपळगाव, गोंदिया जिल्ह्यातील डोंगरगाव ते पिताबंरटोला दरम्यान ७.५० मिटर अंतराचे ४ भुयारी मार्गांना वन्यजिव विभागाच्यावतीने मंजुरी मिळाली.



वन्यजीवांच्या रक्षणाच्या दृष्टीने आणि त्यांना मोकळीक मिळावी, मानवी जिवांचा व्यत्यय येऊ नये याकरिता नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलातील गावांचे पुनर्वसन करण्यात आले.


आजघडीला वन्यजीवांकरिता जे-जे हवे ते-ते करण्याकरिता नागझिरा-नवेगावबांध व्याघ्र प्रकल्पात उपाययोजना करण्यात येत आहेत.महामार्गाच्या दोन्ही बाजूला घनदाट जंगल आहे. त्यामुळे वन्यप्राणी खाद्याच्या शोधात भटकंती करत असतात. त्यांना राष्ट्रीय महामार्ग ओलांडून इकडून तिकडे प्रवास करावा लागतो. यात राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना भरधाव वाहनांच्या धडकेत दरवर्षी डझनभरापेक्षा जास्त वन्यजीवांचा जीव जातो.

या मार्गातील भुयारी मार्गाच्या बांधकामाला वेगाने सुरवात झाली असून येत्या वर्षभरात हे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे या भूयारी मार्ग व उड्डाणपूलासाठी तसेच रस्ता सरळ करण्यासाठी राखीव जंगलात असलेल्या मोठमोठ्या पहाडांनाही फोडण्यात आले आहे.गेल्या वर्षभरापासून या भूयारी मार्गाचे बांधकाम सुरु झाले असून अदानी व मौदा येथील विज प्रकल्पाच्या राख-चा वापर सुध्दा या बांधकामात मोठ्याप्रमाणात करतांना दिसून येत आहे. डुग्गीपार जवळील शशीकरण पहाडीजवळ आणि पितांबरटोल्याजवळ उड्डाणपूलाचे खांबही उभे झाल्याचे दिसून येत असल्याने येत्या काळात वन्यप्राण्यांचा वाहनामुळे जाणारा जीव वाचण्यास मदत होणार आहे.

## गोंदियात जिल्हा कारागृहाची प्रतीक्षा, कारागृह निर्मितीच्या हालचाली थंडावल्या

**गोंदिया:-** जिल्हा निर्मितीला २४ वर्षे होत असताना ही गोंदियासारख्या दुर्गम,जंगलव्याप्त,नक्षलप्रभावित जिल्ह्यात कारागृह नसल्याने येथील आरोपींना दूर अंतरावरील भंडारा येथील कारागृहात न्यावे लागते.त्यामुळे शासनाच्या पैशाचा आणि वेळेचाही अपव्यय होतो. दशकभरार्षापुवी जिल्हा कारागृह बांधकामाच्या हालचाली सुरू ही झाल्या,मात्र माशी कुठे शिंकली कुणास ठाऊक! तेव्हापासून कारागृह निर्मितीच्या हालचाली थंडबस्त्यात आहेत.जेव्हा गोंदिया कारागृहाकरीता पोलीस मुख्यालय शेजारी असलेल्या कारंजा परिसरात जागेची पाहणी आधीच करण्यात आलेली आहे.

गोंदिया जिल्ह्यात भंडारा जिल्ह्यापेक्षा गुन्ह्याचे प्रमाण अधिक आहे.दर महिन्याला सरासरी दीडशे आरोपींना गोंदियातून भंडारा येथील कारागृहात पाठविले जाते.यासाठी पोलिस बळ व पैसा ही खर्च होतो. आरोपी अधिक किंवा अट्टल गुन्हेगार असल्यास वाहन व पोलिस कुमकची स्वतंत्र व्यवस्था करावी लागते.त्यातच संधी साधून कैदी पळून जाण्याची भितीही असते आणि गत काळात अशा घटना देखील घडल्या आहेत. सर्व परिस्थिती पाहता गोंदियात कारागृहाची निर्मिती आवश्यक आहे.शासनाने सन २०११-१२ मध्ये गोंदियात "वर्ग एक'चे कारागृह तयार करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिली होती. त्यानंतर जागा पाहण्याच्या हालचाली झाल्या. तत्कालीन कारागृह अधीक्षक बदलून गेल्याने प्रस्ताव पडून राहीला. नंतर राज्य शासनाच्या नगररचना विभागाने गोंदियात वर्ग २ च्या कारागृहाला मंजूरी देत जागेचा शोध घेण्याचे पत्र काढले.त्यानुसार जागेची पाहणी झाली.येथील पोलिस मुख्यालय परिसरात जिल्हा कारागृह निर्मिती करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. बांधकाम अंदाजपत्रक आराखडा तयार झाला. इमारत बांधकामासाठी खर्चाचा अहवाल शासनाने मागविला. यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने आराखडा तयार केला. ३०० कैद्यांची क्षमता असलेले कारागृह निर्माण होणार होते.मात्र, दशकभराचा काळ लोटूनही गोंदियाला कारागृह मिळू शकले नाही. यासाठी तत्कालीन शासन, प्रशासन व लोकप्रतिनिंधींचे प्रयत्न कमी पडले असावे, असेच म्हणावे लागेल.



### भंडारा कारागृहावर भार

**गोंदिया येथे कारागृह नसल्याने येथील कैद्यांना भंडारा कारागृहात पाठविले जाते.तेथील कारागृहाची क्षमता ३५० कैद्यांची आहे. आज स्थितीत या कारागृहागृहात ४०० पेक्षा अधिक कैदी आहेत. काही दिवसांपुवी ही संख्या ५५० च्या आसपास होती. विशेष म्हणजे आज स्थितीत २५० पेक्षा अधिक कैदी गोंदिया जिल्ह्यातील असल्याची माहिती आहे.**

### गोंदिया जिल्हा कारागृहाचा प्रस्तावाला प्राधान्यता नाही

**तुरुंग विभागाकडून कारागृहाकरीता आमच्याकडे अनेक प्रस्ताव आ-लेले आहेत,त्यात गोंदियाचाही प्रस्ताव आहे.निधी आणि इतर बाबींचा विचार करुन निर्णय घेतला जातो.मात्र गोंदियाच्या कारागृहाबाबत प्रस्तावासोबत हे प्राधान्याचे आहे असे कुठलेच पत्र नसल्याची माहिती मुंबई येथील महाराष्ट्र राज्य पोलीस हाऊसिंग बोर्डाच्या अधिकारी वृषाली जोशी यांनी मटा ला सांगितले.तसेच कारागृह महानिरिक्षक कार्यालयच याबाबत अधिक निर्णय घेऊ शकतात असे सांगितले.**

### समिती निर्णय घेणार:पिंगळे

**जिल्हा कारागृह निर्मितीचा यापुवीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होता, आता तो पोलिस हाऊसिंग बोर्डाकडे वळविण्यात आला आहे.यावर समिती निर्णय घेणार असल्याचे जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांनी सांगितले.**

## चला जाणू या नदीला अभियानात लोकसहभाग वाढवा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमार



**गोंदिया :** चला जाणू या नदीला हे अभियान यशस्वी होण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असून नदी तटावरील नागरिकांना या अभियानात सहभागी करून घ्यावे अशा सूचना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केल्या. स्वातंर्त्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मचला जाणू या नदीलाफ अभियानाच्या जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत या अभियानाचा आढावा घेण्यात आला.

सहाय्यक वनसंरक्षक प्रदीप पाटील, जिल्हा अधी-क्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनंत जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर, सत्यजीत राऊत, शिक्षणाधिकारी कादर शेख, नदी समन्वयक दिलीप पंधरे, मुकुंद धुर्वे व समिती सदस्य या बैठकीला उपस्थित होते.

चला जाणू या नदीला अभियानात गोंदिया जिल्ह्यातील चुलबंद नदीचा समावेश करण्यात आला आहे. चुलबंद नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील हा जांभळी येथील जंगल परिसरात असून सडक अर्जुनी तालुक्यातील २८ व गोरेगाव तालुक्यातील ६ अशी एकूण ३४ गावे नदी तटावर आहेत. चुलबंद नदी सडक अर्जुनी तालुक्यातून मार्गक्रमण करीत पुढे भंडारा जिल्ह्यात प्रवेश करते. चुलबंद नदीची अंदाजे १८ ते २० किमी लांबी गोंदिया जिल्ह्यात येते.

नदीचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने सादर करावयाचा असल्याने नेमून दिलेल्या विभागाने आपल्या विभागाची माहिती त्वरित समितीला सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिका?यांनी दिले. मागील दहा वर्षांचे पर्जन्यमान, वनक्षेत्रात असलेली गावे, नद्यांच्या प्रदूषणाचा मागील तीन वर्षांचा अहवाल, पाझर तलाव साठवण तलावाची नावे, लागवडी योग्य एकूण क्षेत्र, पुरप्रवण क्षेत्रातील गावे, जिल्ह्या-तील मत्स्यव्यवसाय, पाणलोट क्षेत्रनिहाय भूजल अहवाल, नद्यांचे नकाशे, जिल्ह्यातील पर्यटन व धार्मिक स्थळे, मल निस्सारणाची माहिती, पाण्याचा ताळेबंद, खा?या आणि गोड्या पाण्याची समस्या असलेली गावे व चुलबंद नदी पात्र व नदी शेजारील क्षेत्रा-तील अतिक्रमण बाबतची माहिती संबंधितांनी सादर करायची आहे असे त्यांनी सांगितले.

या माहितीवर आधारित नदीच्या समस्या व अडचणी याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करण्यात येणार आहे. या सोबतच नदी संवाद यात्रा देखिल आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठीच्या निधीची तरतूद जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्याच्या सूचना १४ ऑक्टोबर २०२२ शासन निर्णयात करण्यात आली आहे. चुलबंद नदीच्या समस्या व त्यावरील उपाययोजना सुचविण्यासाठी नदीचा अभ्यासगट, नदी समस्या विश्लेषण गट, नदी निदान गट, नदी उपचार गट, नदी क्षेत्रात असलेल्या शाळा महाविद्यालयामधील तज्ञ व्यक्तींचा गट व लोकशिक्षण गट स्थापन करण्यात आले आहेत. आवश्यक तेथे या गटातील संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

## नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळला; वेडमपल्ली जंगल परिसरात पोलीस-नक्षल चकमक



**गडचिरोली :** भूमकाल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांच्या विशेष पथकाने नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावला. नक्षलविरोधी अभियानादरम्यान अहेरी तालुक्यातील पेरमीली हद्दीत येणाऱ्या वेडमपल्ली परिसरात नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये चकमक उडाली. चकमकस्थळावरून एक पिस्तुल, भरमार बंदुकीसह मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात आले.

रविवारी अहेरी तालुक्यातील वेडमपल्ली जंगल परिसरात दुपारी २ वाजताच्या सुमारास नक्षलविरोधी अभियान राबवित असताना दडून असलेल्या जवळपास २० ते २५ नक्षल्यांनी पोलिसांच्या विशेष पथकावर गोळीबार केला. प्रत्युत्तरात पोलिसांनी देखील गोळीबार केला. दरम्यान पोलिसांचा वाढता दबाव पाहून नक्षल्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला. यावेळी चकमकस्थळी १ पिस्तुल,१ भरमार बंदूक,१ वॉकीटॉकी चार्जरसह मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य आढळून आले.

भूमकाल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर नक्षली मोठा घातपात घडवून आणण्याच्या तयारीत होते. मात्र, पोलिसांच्या सतर्कतेने त्यांचा डाव उधळून लावण्यात आल्याचे पोलीस विभागाचे म्हणणे आहे. पोलीस जवानांच्या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी कौतुक केले आहे. मागील काही दिवसांपासून दक्षिण गडचिरोली परिसरात नक्षल्यांच्या हालचाली वाढल्या आहे. त्यामुळे या भागात पोलिसांनी देखील नक्षलविरोधी नक्षलविरोधी अभियान वाढवण्यात आले आहे. हे विशेष.

## व्यसनाधीन कर्मचाऱ्याचा आरोग्य केंद्रात गोंधळ; गंगाझरी पोलिसांत गुन्हा दाखल

**गोरेगाव :** तालुक्यातील ग्राम कवलेवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील एका कर्मचाऱ्याने दारूच्या नशेत केंद्रात गोंधळ घातला. एवढेच नव्हे तर त्याला हटकणाऱ्या आरोग्य सेविकेला शिवीगाळ करण्यात आली. दरम्यान, या प्रकारामुळे गावकऱ्यांनी मध्यस्थीचा प्रयत्न केला असता तो नशेत असल्याचे दिसून आले. या प्रकरणाने कवलेवाडा गावात एकच खळबळ उडाली असून , वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून गंगाझरी पोलिसांत आरोपी राहुल गोस्वामी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

कवलेवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत राहुल गोस्वामी हा शुक्रवारी (दि.१३) रात्री प्राथमिक आरोग्य केंद्रात गोंधळ करीत होता. दरम्यान, कार्यरत आरोग्य सेविकेने त्याला हटकले असता त्याने तिला शिवीगाळ केली. त्यानंतर शनिवारी (दि.१४) सकाळी पुन्हा राहुल गोस्वामी याने नशेत गोंधळ घालणे सुरू केले. यावर आरोग्य सेविकेच्या पतीने त्याला हटकले असता आरोपीने धक्काबुक्की केली. दरम्यान, गोंधळ वाढत गेल्याने गावकरीही प्राथमिक आरोग्य केंद्रात जमा झाले. या घटनेची माहिती गंगाझरी पोलिसांना देण्यात आली असून , दरम्यान पोलिसांनी घटनास्थळ गाठून आरोपी राहुल गोस्वामी याला ताब्यात घेतले आहे. फिर्यादी वैद्यकीय अधिकारी आलोक शुक्ला यांच्या तक्रारीवरून गंगाझरी पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ कलम ८५(१) भादंवि अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरूआहे.

## रानडुकराची शिकार करणारे एफडीसीएमच्या जाळ्यात

**सडक अर्जुनी :** तालुक्यातील जांभळी वनपरिक्षेत्रात १५ जानेवारी रोजी रानडुक्कराची शिकार करुन त्याचे मांस बाळगणा?या पाच आरोपींनाएफडीसीएमने अटक केली. या प्रकरणातील दोन आरोपी फरार असून अटक केलेल्या आरोपींजवळून २ किलो मांस जप्त करण्यात आले.जांभळी वनपरिक्षेत्रात रानडुकराची शिकार करुन मांस खाण्यासाठी चारचाकी वाहनातून घेऊन जात असल्याची गोपनीयमाहिती एफडीसीएमला मिळाली. या माहितीच्या आधारे वनपरिक्षेत्राधिकारी, आमगावचे फिरते पथक व जांभळीचे वनधिका?यांनी उमरझरी तेजांभळी दरम्यान नाकाबंदी केली. यादरम्यान एक चारचाकी वाहन संशयास्पद आढळल्याने त्याची तपासणी केली असता वाहनाता रानडुकराचीशिकार करुन त्याचे २ किलो मांस आढळले.याप्रकरणी अंकोश रहांगडाले, प्रविण बिजेवार, अशोक इळपाते, विशाल कोचे, भिवराम मंडारे यांना अटक करण्यात आली असून काशीरामसय्याम, श्रीचंद उईके फरार झाले. आरोपींवर भारतीय वन्यजीव अधिनियम १९७३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच आरोपींनाअटक करण्यात आली. ही कारवाई जांभळी वनपरिक्षेत्राचे अधिकारी एम.एन.नंदेश्वर, वनपाल आर.एन.लांबट, डी.ए.सूर्यवंशी,एन.जी.शिनगरापुतळे, फिरत्या पथकातील वनरक्षक एम.टी.घासले,आर.टी.गौतम ,एस.टी.बिसेन,डी.एस.मिसे यांनी केली. पुढील तपास आमगावफिरत्या पथकाचे वनपरिक्षेत्राचे अधिकारी एम. एस. बागळे करीत आहेत.

## समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी पुकारला एक दिवसाचा संप



**गोंदिया:** महाराष्ट्रातील समुदाय आरोग्य अधिकऱ्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी राज्यातील सुमारे १० हजार आरोग्य अधिका?यांनी एकदिवसीय काम बंद आंदोलन पुकारले होते. भंडारा जिल्ह्यातही आरोग्य अधिका?यांनी आंदोलनात सहभाग नोंदविला. मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

गेल्या सहा वर्षांपासून सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यभरातील समुदाय आरोग्य अधिकारी उत्तमरित्या सेवा प्रदान करीत आहेत. राज्याच्या आरोग्यव्यवस्थेला देशात तिसऱ्या क मांकावर आणण्यामध्ये या सर्व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे. परंतु, प्रमाणिकपणे सेवा प्रदान करीत असताना समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व आर्थिक नुकसान त्यांचे मनोबल खच्चीकरण करीत आहे. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी राज्यातील १० हजार समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी हे आंदोलन पुकारले.

समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना सेवेत कायम करुन गट ब अधिकाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ४० हजार मानधनावर वार्षिक वेतनवाढ व अनुभव बोनस देण्यात यावा. निश्चित वेतन व कामावर आधारीत वेतन यांचे प्रमाण बदलून निश्चित वेतन ३६ हजार रुपये व कामावर आधारित वेतन ४ हजार रुपये करण्यात यावे. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीसंदर्भात धोरण निश्चित करण्यात यावे. २३ इंडिकेटरचे कामावर आधारीत मोबदला रद्द करण्यात यावा. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार बढती देण्यात यावी. हार्ड एरिया अलाऊंस देण्यात येणाऱ्या क्षेत्राच्या यादीत शासन निर्णयानुसार समाविष्ट क्षेत्राचा अंतर्भाव करण्यात यावा. टिए-डीए देण्यात यावा. आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

या सर्व मागण्यांना घेऊन आज जिल्हा परिषद कार्यालयासमोर जिल्ह्यातील आरोग्य अधिकाऱ्यांनी सर्व प्रकारचे ऑनलाईन पोर्टलचे काम बंद करुन कामबंद आंदोलन पुकारले. मागण्यांवर विचार न झाल्यास २३ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत कामबंदचा इशारा देण्यात आला आहे. मागण्यांचे निवेदन संघटनेच्या पदाधिका?यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, आयुक्त आरोग्य सेवा यांना पाठविले. या आंदोलनात भंडारा जिल्ह्यातील १५० आरोग्य अधिकारी सहभागी झाले होते.

कामबंद आंदोलनात डॉ. आशिष रहांगडाले, डॉ. गोकुल बिसेन, डॉ. दिनेश कटरे, डॉ.चंदन रंगारी, डॉ. मयुर टेंभुर्णे, डॉ.जुनेद सैयद, डॉ. सुशील अंबुले, डॉ.योगेंद्र भगत, डॉ.शशांक, डॉ.चंद्रास, डॉ.सरिता ठाकुर, डॉ.इंदिरा, डॉ. सोनाली गौतम, डॉ. उमाकांत पटले, डॉ. प्रवीण उज-वणे, डॉ.परमानंद कठाने, डॉ.स्नेहा पटले, डॉ. पूजा ठाकुर, डॉ.श्रुती सव्वालाखे, डॉ. प्राची, डॉ. प्रियंका भगत, डॉ.साखरे, डॉ.रोहित, डॉ. निशांत, डॉ. विलास, डॉ. गुरबेले, डॉ.महेंद्र, डॉ. रितेश, डॉ. नाजिया, डॉ.योगेश हिरापुरे, डॉ. प्रशांत व इतर सहभागी झाले होते.

## *अज्ञात आरोपींनी जाळल्या दुचाकी*
### रेलटोली परिसरातील घटना; शेजारची दुकानेही जळाली



**गोंदिया:** अज्ञात दोन आरोपींनी पेट्रोल टाकून चार दुचाकी जाळल्याची घटना सोमवारी (ता. १६) पहाटे चारच्या सुमारास रेलटोली येथील गुजराती नॅशनल शाळेसमोर घडली. उल्लेखनीय म्हणजे, दुचाकींच्या आगीची धग शेजारच्या दुकानांमध्येही पोहोचून दोन दुकाने जळाले. या घटनेतील आरोपी सीसीटीव्हीत कैद झाले असून, रामनगर पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

पॅसिफिक हॉटेलमधील कामगारांच्या या दुचाकी असल्याची माहिती आहे. सोमवारी पहाटे पॅसिफिक हॉटेल येथील सुरक्षा रक्षकाला काही तरी जळाल्याचा वास आल्यामुळे त्यांनी बाहेर निघून बघितले. यावेळी चार दुचाकी जळत असल्याचे दिसून आले. त्यांनी याबाबतची सूचना जवळील अरोरा मशिनरीच्या मालकांना भ्रमणध्वनीवर देऊन त्यांना बोलावून घेतले. तसेच आपल्या हॉटेलच्या इतर सहकाऱ्यांना बोलावून जवळील गुजराती शाळेतील नळ व हॉटेल येथील साहित्यांच्या सहाय्याने ही आग विझविण्यात आली. या जाळपोळ प्रकरणात पॅसिफिक हॉटेल येथील कामगार नितीन गौतम, जितेंद्र जांभूळकर, मुकेश भावे, जितेंद्र वैद्य या चार कामगारांच्या दुचाकी व सूर्यवंशी इंश्योरेन्ससमोर उभी असलेली दुचाकी जळून खाक झाली. यात प्रत्येकी ९० हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणातील चार दुचाकी मालकांसह अरोरा मशिनरीच्या मालकांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दुचाकी जाळपोळीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून, पोलिस तपास करीत आहेत.

## संपादकीय

# शासकीय कार्यालयांमध्ये खाजगी कर्मचारी व एजंट कशासाठी?

राज्यातील कुठल्याही तलाठी व तहसिल,जिल्हा परिषद कार्यालयात जा! तेथे तलाठी, इतर नियमीत कर्मचारींपेक्षा खाजगी व्यक्तीच जास्त काम करताना दिसतात. हीच परिस्थिती कमी अधिक प्रमाणात तहसील कार्यालय, नगर भुमापन कार्यालये, एक्साईज , काही पोलिस ठाणी, काही नगर पालिका,जिल्हाधिकारी,जिल्हा परिषद,मग्रारोहयो,कृषी विभाग कार्यालयांचे काही विभाग व विविध शासकीय कार्यालयांमध्ये आढळते.आत्ता तर लोकप्रतिनिधीच्या कक्षातही यांचाच वावर अधिक भरणा दिसून येतो. ज्या गोष्टी शासकीय बंधनात राहून करणे या अधिकाऱ्यांना अवघड असते, त्या गोष्टी या सतत राबता असणाऱ्या खाजगी व्यक्तिंच्या माध्यमातून होत असतात. काही जिल्ह्यात जिमखाने आहेत. तेथे विविध विभागांचे बडे – बडे अधिकारी नियमित येत असतात. अशा जिम खान्यात काही खाजगी व्यक्तिही सदस्य असतात. त्यांचेही नियमित येणे – जाणे असते. त्या पैकी एक – दोन – चार व्यक्तिंचे येणे जाणे हे केवळ जिमखान्यात येणाऱ्या बड्या अधिका?यांच्या संपर्कात राहून त्यांच्याकडे आलेली कामे मार्गी लावून देणे, एवढ्यासाठीच असते. अर्थात तेथे होणारे बहुतेक डिल हे फूकट होत असतील या भ्रमात कुणीच राहात नसते. या उलट विविध तलाठी , सर्कल तहसील व अन्य कार्यालयांमध्येही खाजगी मंडळी – एजंट अगदी शासकीय कर्मचारी असल्यागत वावरत असतात. वरीष्ठांना ही बाब माहिती असते, पण कुणी आक्षेप घेत नाही. अर्थात या व्यक्ती त्या कार्यालयांमध्ये काय – काय उद्योग करतात ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचाही कुणी प्रयत्न करताना दिसत नाही. हवेली उपविभागीय अधिकारी संजय आसवले यांनी मात्र अशाच एका प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी या बाबत चौकशीचे आदेश तहसीलदार यांना दिलेत. कोलवडी येथील एका शेतकऱ्याच्या जमिनीच्या दस्तात खाडाखोड आढळून आली. तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. तलाठी कार्यालयातील खाजगी कर्मचाऱ्याने हा उद्योग केल्याचा संशय आहे. आता हा विषय चौकशीच्या घेऱ्यात आल्याने, सर्वत्र असणाऱ्या अशा खाजगी कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाचा व त्यामुळे घडणाऱ्या गैरप्रकारांचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. काही वर्षापुर्वी गोंदिया जिल्ह्यातील तहसिल कार्यालयामध्ये सुध्दा अशाचप्रकाराची काही काम कागदपत्र बनावट प्रमाणपत्र तयार करण्यात आल्याचा प्रकार घडलेला होता.परत राज्यातील हवेली उपविभागातंर्गत अशा प्रकार उघडकीस आलेला आहे.शासकीय कार्यालयांची अवस्था आज अशी झाली आहे, की त्या – त्या कार्यालयांमध्ये बदलून येणाऱ्या अधिकाऱ्यांना कार्यालयाची – दप्तराची – प्रकरणांची माहिती कमी असते व या खाजगी कर्मचाऱ्यांना अधिक असते. त्यांच्या शिवाय अधिकाऱ्यांचे पान हलत नाही. अर्थात त्या बदल्यात अशा खाजगी कर्मचाऱ्यांच्या उत्पन्न स्त्रोताकडे त्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करावे लागते. त्याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो. कार्यालयातील या खाजगी व्यक्ती बऱ्याच करामती असतात. एखादे शेतजमीन हस्तांतरण किंवा अन्य काही चौकशी कामाची गोपनीय कागदपत्रे त्या कार्यालयात दाखल झाली, की काही मिनिटात त्याच्याशी हितसंबंध असणाऱ्या इतर व्यक्ती किंवा विरोधातील व्यक्ती पर्यंत माहिती पोहोचून जाते. बऱ्याचदा कागदपत्रात हेरफार – खाडाखोड – एखादा कागद गहाळ होणे किंवा परस्पर नवीन कागद जोडला जाणे – कागदांची अदला बदली करणे किंवा आख्खे प्रकरणच अडगळीत टाकणे – गायब करणे असे कितीतरी प्रकार या खाजगी कर्मचाऱ्यांकडून केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्य पातळीवर सर्वत्र हे खुलेआम सुरु आहे. खरे म्हणजे राज्यभर त्या – त्या विभागांच्या महसूल आयुक्तांनी त्यांच्या विभागातील प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात विविध शासकीय कार्यालयांमध्ये कुठे – कुठे असे खाजगी कर्मचारी कार्यरत आहेत ? कुठल्या कार्यालयात या प्रकाराच्या खाजगी व्यक्तिंचा – एजंटांचा सतत राबता आहे ? या बाबतचा आढावा घेतला पाहिजे. वेगळ्या सोर्सेस मधुन अहवाल मागविले पाहिजेत. क्रॉस चेक केले पाहिजेत. त्या विरोधात कारवाई केली पाहिजे. सामान्य नागरिकांना स्वच्छ प्रशासनाची अनुभुती यावी, यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. राज्याचे मुख्य सचिव – विविध प्रधान सचिव व विभागीय आयुक्त यापैकी कोण ही मोहिम राबविणार आहे? विचारत आहेत नागरिक!

# सत्यशोधकांची "दाढी"

लेखाचे प्रस्तुत शिर्षक वाचून कदाचीत वाचकांना सत्यशोधकांच्या ङ्गदाढीफ विषयी काही लिहिले का? असा प्रश्न पडू शकतो किंवा महात्मा जोतीराव फुलेंच्या छायाचित्राला चिकटलेली त्यांच्या चेहऱ्यावरची दाढी याचा मजेशिर असलेला किस्साही आठवू शकतो. परंतु तसे काही नसून अमरावती जिल्ह्यातील भातकुली पासून आठ दहा कि.मी.अंतरावर असलेले, दाढी–पेढी म्हणून ओळखले जाणारे गाव असून, दाढी आणि पेढी नावाचे दोन गावे आहेत. त्यांची नावे मात्र जुळ्यासारखीच घेतली जातात. अमरावती जिल्ह्यातील हद्द या गावापासी संपून अकोला जिल्ह्याची हद्द सोनेरी–बपोरी या गावापासून सुरु होते. मध्यंतरी विधान परिषदेतील आमदार अमोल मिटकरी यांच्या ब्राम्हण समाज आणि लग्न या संबंधीच्या भटजीच वधुचा नवरा कसा होतो, या विधानावरुन महाराष्ट्र वैचारिक दृष्ट्या ढवळून निघाला होता. या पुस्तकाचे लेखक शामराव सीतारामजी कुलट यांचे गाव होय. हे त्यांचे मुळ गाव नव्हे अकोट तेल्हारा जवळील वरुड नावाचे गाव त्यांचे मुळ असावे असे वाटते.

इयत्ता तिसरी पर्यंत शिक्षण झालेल्या शामराव सीतारामजी कुलट यांच्या नावे दोन पुस्तके असून दुसरे पुस्तक सत्यशोधक समाजाचे अभंग हा आहे. सत्यशोधक समाजाचे अभंग ही एकुण ३० पृष्ठांची पुस्तिका असून ते १९२२ साली करजगावकर सत्यशोधककृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी सुबोध छापखाना, अमरावती येथून प्रकाशित केले होते. तर दुसरे भटजीच वधूचा नवरा अथवा पुरोहितांची पापे ही ४३ पृष्ठांची पुस्तिका त्यांनी (पहिली आवृत्ती) १९३१ साली हनुमान प्रेस. पुणे येथून प्रकाशित केली. तर मो.तु.वानखेडे यांच्या ब्राम्हण आणि बहिष्कार या पुस्तिकेची दुसरी आवृत्ती २६ जुलै १९२३ रोजी सत्योदय छापखाना करजगाव येथून शामराव कुलट यांनी प्रकाशित केली. त्यांचे लेखन दीनमित्र, सत्यप्रकाश, विश्वबंधू, गरिबांचा कैवारी इत्यादी पत्रातून प्रसिद्ध झाले होते. दि.२६ जानेवारी १९३८ ला दीनमित्र पत्राचा खास सिल्व्हर ज्युबली अंक प्रसिद्ध झाला. त्यामध्ये सत्यशोधक समाज आणि दीनमित्र ज्ञानौषधालय या शिर्षकाचा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी दीनमित्र पत्राचे योगदान यावर विस्तृत लिहिले होते. त्याशिवाय ऋण काढून सण करु नका दीन मित्र (८ सप्टेंबर १०२६) भट गारुड (दीनमित्र २ मे १९२७) व स्त्रियांचा सधर्म (दीनमित्र ९ ऑक्टोबर १९२९) असे लेख आढळतात.

शामराव सीतारामजी कुलट यांच्या साहित्य संबंधाने विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य डॉ. अशोक चोपडे यांच्या ग्रंथात विस्तृत चर्चा केली. तसेच सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड–२ या डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या ग्रंथात तसेच महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राहमणोत्तर चळवळ स्वरूप व वाटचाल (इ.स.१९७३–१९५०) या ग्रंथात सुद्धा चर्चा केली असून माहितीपर चर्चा जी.ए. उगले यांच्या सत्यशोधकांचे अंतरंग या ग्रंथात केली आहे. शामराव कुलट यांच्या संदर्भाततत्कालीन मोतीराम तुकारामजी वानखेडे, जनरल सेक्रेटरी, स.शो.समाज यांनी त्यांच्या सत्यशोधक समाजाचे अभंग या पुस्तकावर अभिप्राय नोंदवितांना त्यांच्या सुंदर हस्ताक्षर पाहून अत्यानंद झाल्याचे म्हटले आहे. तर प्रतिभा व कवित्वाविषयी संतोष व्यक्त केला आहे. सखारामजी शिवरामजी पाटील अध्यक्ष स.शो.समाज मु. हिरपूर ता.मुर्तीजापूर जि.अकोला यांनी हे पुस्तक सत्यशोधक समाजाचे तत्वाला परिपोषक आहे. असे म्हणून अक्षर केवळ छापधानाच आहे. एखादे वर्तमानपत्र सुद्धा आपण चालू शकता असता असे म्हटले आहे. सखारामजी शिवरामजी पाटील यांच्या विषयी हिरपूर येथे कोणतीही माहिती मिळतत नाही. प्रस्तुत लेखकाने त्याविषयी शोध घेतला आहे.

सुबोधमालेचे संपादक के.बी.देशमुख यांनी त्यांना सुधारणावादी उर्फ उदारमतवादी म्हटले आहे. हे अभंग त्यांच्याच सुबोध छापखान्यात छापले होते. सदर पुस्तक मोतीराम तुकारमा वानखेडे यांना अर्पण केले आहे. दिनमित्रकारर मुकुंदराव पाटील यांनीही दीनमित्र मधून अभिप्राय दिला होता. सत्यशोधक पुस्तक माला, पुष्प दुसरे भटजीच वधूचा नवरा अथवा पुरोहितांची पापे हे पुस्तक वहाडातील ब्राम्हणीतरांचे सुप्रसिद्ध पुढारी, समाजभुषण श्रीयुत नारायणराव गणपतरात उर्फ नानासाहेब अमृतकर, बी.ए.एल.एल.बी. वकील मोर्शी यांना त्यांच्या कार्याचा गौरव करुन त्यांच्या पवित्र सदगुणास सादर लुब्ध होऊन अत्यंत आदर बुद्धीने अर्पण केले आहे. यात नारायणराव गणपतराव अमृतकर यांचे छायात्रिचही छापले आहे. या पुस्तकारत सत्यशोधक समाज मताची वर्तमानपत्रे यांची यादी दिली आहे. या पुस्तकाची नवीन आवृत्ती नुकतीच काही वर्षापुर्वी नाग,नालंदा प्रकाशन, इस्लामपूर येथील मिरजकर यांनी छापून प्रसिद्ध केली आहे. दाढी या गावाचे पोस्ट गणोजा असून तत्कालीन तालुका व जिल्हा अमरावती होता. शामराव कुलट, वरुडकर, मालक सत्यशोधक बुक डेपो, असा पुस्तका वरील पत्ता लेखक प्रकाशक म्हणून दिसतो.



१९२१ साली प्रकाशीत झालेल्या सत्यशोधक महासाधू श्री. तुकाराम महाराज या हरिश्चंद्र नवलकर यांनी लिहिलेल्या व काही वर्षापुर्वी जिजाऊ प्रकाशनने डॉ. अशोक चोपडे यांच्या या संपादनात पुन्हा प्रकाशित केलेल्या पुस्तकात दाढी येथील सत्यशोधक समाजाच्या शाखा विषयी माहिती आहे. त्यामध्ये या शाखेचे अध्यक्ष पाडुरंग धनाजी जाधव होते. तर सेक्रेटरी श्री. शामराव सीतारामजी कुलट हे होते. असे दिसते. याच वर्षीदिन मित्र ता.३० माहे जानेवारी १९२९ च्या पत्रात दाढी पेढी येथील एक बातमी आहे. १४/०१/१९२९ रोजी येथे स्त्रियांची सभा भरली. त्यामध्ये सौ.जनाबाई अमृतकर, सौ.गंगुबाई मापारी, सौ.अनुसयाबाई यादगिरे, सौ.जनाबाई सुतार, भीमाबाई पवार, सौ.शेवंताबाई लेंडे, सौ.सरस्वीबाई लेंडे, सौ.गोदावरी सुताराव, सौ.सीताबाई सव्वालाखे वगैरे बऱ्याच स्त्रीया जमल्या होत्या. याप्रसंगी सौ.गयाबाई कुलट यांनी आभार मानून एके ठिकाणी जमण्यापासून फायदे व स्त्री शिक्षणाची जरूरी हे दोन निबंध वाचले तर बहिणाबाई पवार हिने लेकरांची आई हा निबंध वाचला. शेवटी हळदकूंकू पानसुपारी होऊन सभारंभ आटोपला. मडकी पुजणे वगैरे फालतू विधी मुळीच केला नाही. ही बातमी बहिणा पांडूजी पवार यांनी दीनमित्राला पाठविली आहे.

प्रस्तुत लेखकाने दाढी या गावी दोन वेळा भेट दिली. त्यागावात आजही भटजीच वधुचा नवरा पुस्तकाचे कर्ते शामराव सितारामजी कुलट यांना झाडाखाली बसणारे लोक नावानीशी आठवतात. अशिक्षीत लोकांना आजही त्याचे नाव माहिती आहे. यावरुन त्यांच्या कार्याचे महत्व कळते. ज्या बहिणा पाडूरंग पवार यांचावर उल्लेख आला आहे. त्यांचे वडील पांडूरंग आकाजी पवार होते. त्यांना महादेवराव, बहिणाबाई, शांताबाई व विश्वासराव असे मुले होती. बहिणाबाई ही टरकखेडा संभू या गावी मल्हारराव सवाई यांच्याकडे दिली होती. दुसरी मुलगी शांताबाई बी.ए.बी.टी. ही काटोल येथे गुणवंतराव देशमुख यांच्याकडे दिली. विश्वासराव मयत झाले. त्यांचे जेष्ठ चिरंजीव (पांडूजी) महादेवराव पांडूरंग यांना सुरेशराव, रमेश, धनंजय व जगदीश अशी मुले होती. रमेश यांच्या मुलाखतीवरुन वरील माहिती मिळाली. ते गणोजादेवी येथील महासरस्वती विद्यालय येथे वरिष्ठ लिपीक होते. महादेवराव यांचे छायाचित्र सद्या उपलब्ध झाले असून त्यांचे चिरंजीव रमेश यांनी दिले. त्यांचा मृत्यू १९/०८/१९८२ ला झाला. गावातील जि.प. शाळेची जागा पांडुरंगजी यांची होती. पांडुरंगजी यांच्या प्रमाणे महादेवराव यांनी शामराव कुलट यांना मदत केली होती. महादेवराव यांनी भटजीच वधूरा नवरा च्या १६ प्रति खरेदी केल्या होत्या. गोपाळराव पांडुरंगजी लेंडे यांना शामराव कुलटांचे घर विकले होते. भटजीच वधुरा नवरा या पुस्तकासाठी आगाऊ पैसे देऊन शामराव कुलट यांना एकुण अठरा लोकांनी मदत केली. त्यामध्ये तीर्थस्वरुप गं.भा.मातोश्री तुळसाबाई भगाजी ठाकरे, दाढी यांनी १६ प्रति बुक केल्या होत्या. त्यांचे आणि शामराव कुलट यांचे घर आमोरासमोर होते. सत्यशोधक महासाधू या पुस्तकात त्यांचे आडनाव जाधव लिहिले आहे. ते जाधव नसून लेंडे आहे. पांडुरंगजी यांना विश्वासराव नावाचा मुलगा होता. त्यांचे आणि कुलटांच्या घराचे घरोब्याचे संबंध होते. ते कुलट यांच्या मुलींना बहिण मानीत होते. आजही त्यांच्या घराण्याचा संबंध कायम आहे. अशी माहिती प्रकाश विश्वासराव पाटील यांनी दिलेल्या मुलाखतीस सांगितले. लक्ष्मणराव सखरामजी पाटील, टाकरखेड (काऱ्याचे) दर्यापूर खोलापूर जवळ असणाऱ्या गावचे होते. त्यांनी १६ प्रति आगावू बुक केल्या होत्या. महादेवराव पांडुरंगजी पवार देशमुख यांनी सुद्धा १६ प्रति बुक केल्या होत्या. त्यांच्याविषयी मागील परिछेदात माहिती आलीच आहे. तुकारामजी भदाजी क्षीरसागर हे मया पंचाल दाढीचे होते. त्यांनीही १६ प्रति बुक केल्या होत्या. त्यांचे कुणीही सद्या हयात नाही. मल्हाराव सीतारामजी सवाई टाकरखेड (संभूचे) यांनी बहिणाबाई पवार यांच्याशी विवाह केला होता. त्यांनी सुद्धा १६ प्रति बुक केल्या होत्या. कर्ताराम राघाोजी वानखेडे हे लगापूर पोही म्हणून ओखळखल्या जाणाऱ्या गावातील १६ प्रति बुक केल्या होत्या. लक्ष्मणराव रावजी शेळकी बोचरकर, पटवारील, बांबर्डा बु.मुर्तीजापूर तालुक्यातील गावातील होते. त्यांनीही १६ प्रति बुक केल्या होत्या. शामराव वीरभानजी पाटील ठाकरे फुलआमला जि.अमरावती यांनी १६ प्रति जयरामसिंह दादूसींग सवलखे (सव्वालाखे असावे), दाढी यांनी १६ प्रति यांचे गावात कुणीच हयात नाही. रामराव जाणूजी खंडारे, बपोची, सोनोरी–बापोरी म्हणून मुर्तीजापूर तालुक्यातील गाव यांनी १० प्रति बुक केल्या होत्या. कृष्णाजी जयरामजी भोंगाडे, दाढी यांनी १० प्रति बुक केल्या होत्या. त्यांचे आता गावात कुणीच नाही. बाजीराव राजारामजी सपकाळ दाढी यांनी १० प्रति बुक केल्या होत्या. त्यांचे गावात घर नाही. सूर्यभानजी जाणूनजी पन्नासे यांनी १० प्रति बुक केल्या होत्या.त्यांचे गावात घर नाही तो खोडक या गावी गेले आहे. रामचंद्र तुकारामजी बोरकर, सस्तीकर वाडेगाव रस्ती येथील अडत दुकानदार होते. त्यांनी १६ प्रति तर, श्री छत्रपती शाहू इंक फक्टरी, कजबे वाडेगांव ता. पातूर यांनी १६ प्रति बुक केल्या होत्या. कृष्णराव महादेवराव गायकवाड, पोष्टल इंस्पेक्टर पुणे शहर यांनी अमृतकर वकील यांच्या फोट ब्लॉक बनवून दिला होता. अशा पद्धतीने वरील लोकांनी त्यांना पुस्तकासाठी मदत केली होती.

शामराव सिमारामजी कुलट, वरुडकर यांच्या कुटुंबाविषयी थोडी फार माहिती उपलब्ध झाली. ती प्रकाश विश्वासराव पाटील लेंडे, सुधाकर सुखदेवराव लेंडे व रामचंद्र सुखदेवराव लेंडे यांच्याकडून प्राप्त झाली. शामराव सिताराम कुलट यांच्या पत्नीचे नाव गयाबाई होते. त्यांना तीन मुलीच होत्या. एक शंकुतलाबाई ती कारंजा येथे दिली होती. दुसरी सुशिला ही मुकी होती. ती जगतराम तुळशीरामजी पाटेकर, धानोरा पाटेकर या गावी दिली होती. तीचे लवकरच निधन झाले. तिसरी मुलगी वच्छलाबाई ही शंकरराव साबळे, मोझरी जांना दिली होती. सद्या ती हयात असून तिचे वय अंदाजे ९० वर्षाच्या घरात असेल. त्यांना रमेश नावाचा मुलगा आहे, ते सद्या मध्यप्रदेशात खंडवा या गावी राहतात. शामराव कुलटांच्या एकमेव हयात असलेल्या मुलीचे छायाचित्र प्रस्तुत लेखाच्या लेखकाला प्राप्त झाले आहे. शामराव यांचे डोलोरी ता.दर्यापूर जि.अमरावती येथील नामदेव लुंगाजी होते नावाचे सत्यशोधक चळवळीत कम करणारे मित्र होते.

शामराव कुलट यांचे पहिले पुस्तक प्रकाशित होऊन शंभर वर्षे झालीत, तर सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला दीडशेवर्ष पूर्ण झाली. आज १९९० नंतर च्या सत्यशोधक ब्रामणेत्तर चळवळीच्या बहरत्या काळात कार्य करणारे शामराव कुलट यांचे डोलोरी ता.दर्यापूर जि.अमरावती येथील नामदेव लुंगाजी होते नावाने सत्यशोधक चळवळीत काम करणारे मित्र होते.

शामरव कुलट यांचे पहिले पुस्तक प्रकाशित होऊन शंभर वर्षे पूर्ण झालीत. तर सत्यशोधक समाजाच्या स्थापनेलद दीडशे वर्ष पूर्ण झाली. आज १९९० नंतरच्या सत्यशोधक ब्राममणेत्तर चळवळीच्या बहतऱ्या काळात कार्य करणारे शामराव कुलट त्यांच्या कार्य कर्तृत्व व लेखणीच्या द्वारे आजही जिवंत आहे. त्यांच्या शारीरिक वारसदारांनी तरी त्यांचे साहित्य विचार जतन केले नसतील तरी त्यांचे हजारो वैचारिक वारसदार आजही आपणास दिसतात. करजगावकर कृष्णाजी कर्काजी चौधरी व मोतीराम तुकाराम वानखेडे या दोन सत्यशोधकांनी अमरावती जिलह्यातील अशी कितीतरी सत्यशधोकांना कार्यप्रवृत्त व लेखक कवी म्हणून घडविल्याचे दिसते. त्यांचाच परिणाम म्हणजे आजही एखाद्या आडवळणाऱ्या असणाऱ्या गावात शामराव कुलटांचे नाव आठवल्या जाते हेही थोडके नव्हे.

**सतीश जामोदकर**
अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ
अमरावती मो.९४२३३७४६७८

# राष्ट्रसंतांच्या पालखी यात्रेने दुमदुमले भजेपार

**सालेकसा:** तालुक्यातील भजेपार येथे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५४ वा पुण्यतिथी महोत्सव विविध उपक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. दरम्यान राष्ट्रसंतांच्या पालखी यात्रेने संपूर्ण गाव दुमदुमले होते. या तीन दिवसीय महोत्सवात महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

ग्राम स्वच्छता अभियान राबवून गुरुदेव सेवा मंडळाने पुण्यतिथी महोत्सवाची सुरुवात केली. पहिल्या दिवशी सामुदायिक प्रार्थना,ध्यान,चिंतन,भाषण यासह रात्रीला प्रसिद्ध शाहीर मधुकर बांते यांनी आपल्या पहाडी आवाजात राष्ट्रसंतांच्या जीवनावर पोवाड्याच्या माध्यमातून प्रकाश टाकला. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी लोक वर्गणीतून नूतनीकरण करण्यात आलेल्या स्वामी विवेकानंद अध्ययन कक्षाच्या इमारतीचे उद्घाटन आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. स्पर्धा परीक्षेला जिल्ह्यातील जवळपास ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात यशस्वी विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षीस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्ययन कक्षात अभ्यास करून शासकीय नोकरी प्राप्त करणाऱ्या यशवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा देखील सत्कार करण्यात आला. रात्री अनमोल रत्न पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय कीर्तनकार हभप परमेश्वरी सेलोटकर, गुरुकुंज आश्रम मोझरी यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम पार पडला. दरम्यान कीर्तनानंतर त्यांनी लाठी काठी, दांडपट्टा, तलवारबाजी यांचे चित्त थरारक प्रात्यक्षिक सादर करून महिला व मुलींना आत्म सुरक्षिततेचा धडा दिला. यात गुरुदेव उपासकांची अलोट गर्दी होती. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सकाळी गावातून राष्ट्रसंतांची पालखी यात्रा काढण्यात आली. पालखी यात्रेच्या स्वागतासाठी गावकऱ्यांनी आपल्या घरासमोर सडा सारवण करून महापुरुषांच्या फोटो पूजेसाठी ठेवल्या होत्या. गाव भ्रमणानंतर ध्यान मंदिरात पालखी यात्रेची सांगता केल्यानंतर गुरुकुंज आश्रम मोझरी येथील राष्ट्रीय कीर्तनकार तथा ग्रामगीताचार्य राजाजी प्रभू शेलोटकर यांच्या मधुर वाणीतून गोपालकाला करण्यात आला. दरम्यान चार जोडप्यांचे सामूहिक लग्न देखील मंडळाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय शिवणकर, आमदार सहषराम कोरोटे, जिल्हा परिषद सदस्य वंदना काळे, जीप.सदस्य उषा मेंढे, सरपंच चंद्रकुमार बहेकार, माजी सरपंच सखाराम राऊत, माजी जीप. महिला व बालकल्याण सभापती लता दोनोडे, देवराम चूटे, तुकाराम बोहरे, सचिन बहेकार सर्व नव नियुक्त ग्राम पंचायत पदाधिकारी सहित अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. संचालन विवेक बहेकार आणि लोकेश चुटे तथा आभार प्रदर्शन नंदकिशोर कठाने यांनी केले.

पुण्यतिथी महोत्सवाच्या आयोजनासाठी गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष एकनाथ बहेकार, उपाध्यक्ष कृष्णकुमार चूटे, सचिव सेवकराम बहेकार, सहसचिव टायकराम ब्राह्मणकर, कोषाध्यक्ष रामजी चुटे, संघटन अध्यक्ष खुशाल शिवणकर, कार्याध्यक्ष धनराज बहेकार, सर्वाधिकारी महेश चुटे यांनी अथक परिश्रम घेतले. आयोजनासाठी स्थानिक ग्रामपंचायत, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, स्वामी विवेकानंद अध्ययन कक्ष, महीला बचत गट,भजन मंडळ, सूर्योदय क्रीडा मंडळ,श्री मंगरुबाबा चौरागड आश्रम समिती आणि समस्त ग्राम वासियांचे विशेष सहकार्य लाभले.


तीन दिवसीय महोत्सवात गा–वाला जणु मोझरीचे रूप आले होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत)

# कचारगड यात्रे निमित्ताने जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पुर्वतयारी आढावा

**गोंदिया** : सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे दिनांक ३ ते ७ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत यात्रा होणार आहे. या यात्रेच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पुर्वतयारी आढावा घेतला.

सभेला निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनमोल सागर, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कचारगड देवस्थान समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. गोतमारे पुढे म्हणाले, कचारगड यात्रे दरम्यान येणाऱ्या भाविकांची सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्यात यावी. यात्रेच्या ठिकाणी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत अखंडीतपणे सुरु राहील याची दक्षता घ्यावी. विद्युत लाईनच्या खाली दुकाने लावण्यात येऊ नये. वाहनासाठी पार्कींगची व्यवस्था, औषधांचा पुरवठा पुरेशा प्रमाण ठेवण्यात यावा. यात्रे दरम्यान एस.टी.महामंडळाची किमान १५ बसेसची व्यवस्था करण्यात यावी. येणाऱ्या–जाणाऱ्या मार्गावर कुणीही नारळ फोडू नये याची दक्षता घ्यावी. भोजनदानमध्ये शिळ्या अन्नाचा वापर होणार नाही याची काळजी घ्यावी. नगर परिषदेने अग्नीशमन वाहनाची व्यवस्था करावी. यात्रे दरम्यान सीसीटीव्ही कॅमेराची व्यवस्था करण्यात यावी. अनुचित घटना घडू नये यासाठी गॅस सिलेंडर बाबत दक्षता घेण्यात यावी. यात्रेला व्हीव्हीआयपी पाहुणे आले तर गैरसोय होऊ नये म्हणून हेलिपॅडची व्यवस्था करुन ठेवावी. यात्रे दरम्यान शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस विभागाने चोख बंदोबस्त ठेवावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील कर्मचारी दोन महिन्यापासून वेतनाविना



**गोंदिया:–** जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषदेने तालुकास्तरावर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय सुरु केले असले तरी या कार्यालयातील कर्मचारी वर्गाला गेल्या दोन महिन्यापासून वेतनच न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

यासंदर्भात (दि.१२) जिल्ह्यातील तालुका अधिकारी कार्यालयातील कर्मचारी वर्गाने एकत्र येत मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन सादर करीत तत्काळ वेतन देण्याची मागणी केली आहे.

ऑँक्टोंबर २०२२ चे वेतन दिवाळीपुवी देण्यात आले.मात्र नोव्हेंबरपासूनचे वेतन जानेवारी लागूनही देण्यात न आल्याने आमच्या कुटुबियांचा उदरनिर्वाह कसा करायचा अशा प्रश्न निवेदनातून कर्मचारी वर्गाने विचारला आहे.

# "कातुर्ली वॉरियर्स" गाव विकासाचा रोल मॉडेल

## आमदार कोरेटे : सैनिक संघाच्या सैनिक प्रवेशद्वाराचे लोकार्पण




**गोंदिया::** कातुली गावातील ३५ सैनिकांनी एकत्र येत गावाला काही देणं लागते या भावनेतून स्वखर्चाने गावात सुसज्ज आणि भव्यदिव्य असे प्रवेशद्वार तयार केले. त्याला कातुर्ली वॉरियर्स असे नाव दिले. सैनिक संघाच्या वतीने गावात पुन्हा डिजीटल वाचनालय देखील तयार करण्यात येणार आहे. कातुली वारियर्स सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण देखील देण्यात येत आहे. तालुका, जिल्हा नव्हे तर राज्यातील सैनिकांच्या गावांसाठी कातुली येथील कातुर्ली वॉरियर्स सैनिक संघटना गाव विकासाचा रोल मॉडेल ठरेल, असा विश्वास आमदार सहेसराम कोरोटे यांनी व्यक्त केला.

आमगाव तालुक्यातील कातुर्ली येथील कातुर्ली वॉरियर्स सैनिक संघाच्या वतीने बांधकाम करण्यात आलेल्या कातुर्ली वॉरियर्स सैनिक प्रवेशद्वाराचे लोकार्पण भारतीय थलसेनेच्या स्थापना दिवस (आर्मी डे) चे औचित्य साधून रविवारी (ता. १५) पार पडले. यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून माजी म्हाडा सभापती नरेश माहेश्वरी, जि.प. गटनेते सुरेश हर्षे, समाजसेविका प्रा. सविता बेदरकर, सरपंच छगन

### रक्तदानातून शहिदांना श्रद्धांजली

**कार्यक्रमाची सुरुवात रक्तदान शिबिराने करण्यात आली. देशाच्या संरक्षणाकरिता ज्या हुतात्मांनी प्राणाची आहुती दिली. त्या वीर जवानांना श्रद्धांजली म्हणून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. शासकीय रक्तपेढी गोंदियाच्या पथकाने रक्तसंकलन केले. याप्रसंगी गावातील तरुणांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले.**

बावनकर, सैनिक संघाचे अध्यक्ष प्रेमलाल पटले, माजी सरपंच चुन्नीलाल शहारे, गोपीचंद भेलावे, जसवंतराव बावनकर, केशरीचंद बिसेन, डॉ. सिताराम कोरे, भोजलाल जैतवार, नत्थुलाल कटरे, सुभाषचंद्र ठाकूर, प्रेमलाल बिसेन, विजय कोरे, चंद्रभान तरोणे, उपाध्यक्ष कुवरलाल बिसेन आदी उपस्थित होते. आमगाव तालुक्यातील कातुर्ली या गा–वाने देशाला ३५ सैनिक दिले. त्या सैनिकांनी एकत्र येत गाव विकासाचे पाऊल उचलले आहे. प्रथमत: ४.५ लाख रुपये खर्चातून गावाच्या सुरुवातीला भव्य असे प्रवेशद्वार तयार केले असून त्याचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना आमदार कोरेटे पुढे म्हणाले, कातुली येथील सैनिकांनी इतर गावांतील नोकरीत असलेल्यांसमोर एक आदर्श निर्माण करून दिला आहे. कातुर्ली हे गाव आज तालुक्यातच नव्हे, तर जिल्ह्यातील एक आदर्श गाव म्हणून ओळखले जाणार आहे. कातुली वॉरियर्सच्या या उपक्रमाला आपले सहकार्य नेहमी असणार आहे. डिजीटल वाचनालयासाठी त्यांनी ४ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा देखील यावेळी केली. त्याचप्रकारे कातुर्ली रायजिंग स्टार्सच्या करिष्मा मोहनकर हिने आमदार कोरेटे यांनी कातुर्ली ते आमगाव बस सुरू करण्यासंदर्भात निवेदन दिले. आमदार कोरेटे यांनी तातडीने आगार प्रमुखांशी बोलून लवकरच बस सुरू


### गाव झाले देशभक्तीमय

**भारतीय थल सेनेच्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे गावकऱ्यांना आकर्षण लागले होते. सकाळपासूनच गावातील वातावरण अगदी देशभक्तीमय झाले होते. गावात घरासमोर सडा, सारवण करण्यात आले. संघाचे सैनिक आपल्या गणवेशात वावरत होते. तर वॉरियर्सगुपशी संलग्नित असलेल्या रायजिंग स्टार्सने देखील एकाच रंगाचे कपडे परिधान करून अगदी शिस्तीत पाहुण्यांचे स्वागत केले.**

करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान नरेश माहेश्वरी यांनी देखील कातुर्ली वॉरियर्सच्या या उपक्रमांचे कौतूक करून आपण आणि आ–पला पक्ष सदैव मदतीसाठी तत्पर असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकातून समितीचे कोषाध्यक्ष गणेश बिसेन यांनी सैनिक संघाच्या वतीने राबविण्यात येणारे उपक्रम, भविष्यातील कार्यक्रम आणि थलसेना स्थापना दिवसासंदर्भात सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी गावातील भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कातुर्ली रायजिंग स्टार्सचे अमीत गौतम, सागर भेलावे, लक्ष्मी भेलावे, आशा चावके, करिष्मा मोहनकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गावातील इयत्ता १० वी आणि १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. यशस्वितेकरिता मार्गदर्शक जैपाल चावके, मोसमी कटरे, दीपक कोरे, निळकंठ कुंभलकर, धनराज शहारे, भूमेश्वर फरकुंडे, कमलसिंह बरेले, सेवक मोहनकर, नायब सुबेदार लोकचंद कुंभलकर, दिपेश चावके, लखन चावके, नेहा कोरे, सपना पोंगळे, संध्या कोहळे, जितेंद्र कटरे, कुष्नकुमार कटरे यांच्यासह कातुली वॉरियर्स सैनिक संघ, कातुली रायजिंग स्टार्स आणि गावकऱ्यांनी सहकार्य केले.

# देशात हुकूमशहाने जन्म घेतलाय-राकेश टिकैत






**नागपूर :** ज्या देशातील विरोधी पक्ष हा कमजोर असतो,त्या देशात हुकूमशाही जन्माला येते आणि आपल्या देशात

हुकूमशाहीने जन्म घेतला आहे, अशी टीका राष्ट्रीय किसान मोर्चाचे नेते राकेश टिकैत यांनी येथे केली.सोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) नागपुरातील प्रशिक्षण केंद्रात नकली मुस्लीम, हिंदू, शिखांची निर्मिती केली जाते, असा गंभीर आरोप राष्ट्रीय किसान मोर्चाचे नेते राकेश टिकैत यांनी केला. बहुजन संघर्ष समितीच्या वतीने नागपुरातील देशपांडे सभागृहात आयोजित शेतकरी रॅलीत ते बोलत होते. याप्रसंगी प्रामुख्याने मंचावर बहुजन संघर्ष समितीचे नागेश चौधरी, माजी मंत्री सुनील केदार आणि इतरही शेतकरी नेते उपस्थित होते.

सोबतच आत्महत्या करून प्रश्न मिटणार नाही.लढावे लागले.तेव्हा आत्महत्या करू नका,आंदोलनात सहभागी व्हा,असे

आवाहन टिकैत यांनी विदर्भातील शेतकऱ्यांना केले, तसेच खासगीकरणाच्या विरोधात सुरू असलेल्या वीज कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला व स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनालाही त्यांनी आपले समर्थन जाहीर केले.

टिकैत म्हणाले, "आरएसएस'च्या केंद्रात तयार होणाऱ्या या नकली मुस्लीम, हिंदू, शिखांना मग वेगवेगळ्या धर्मांच्या समितीवर नेमले जाते. हा प्रकार सर्वांची विचारधारा बदलण्याचा प्रयत्न आहे. या लोकांना येत्या ५० ते १०० वर्षांत देशाचा इतिहासही बदलायचा आहे. केंद्रातील सत्ताधारी व "आरएसएस'ला संविधान आणि कायदा मान्य नाही. त्यांना कोणत्याही स्थितीत सत्ता हवी आहे. त्यासाठीच मध्यप्रदेश व महाराष्ट्रात निवडून आलेल्या सरकारला उलटवून त्यांनी कशी सत्ता मिळवली लोकांनी बघितले. चांगल्या देशासाठी विपक्ष मजबूत हवा. विरोधी पक्ष कमकुवत झाल्यास हुकूमशहाचा जन्म होतो. भारतातही त्याची सुरुवात झाली आहे.

दिल्लीत १३ महिने शेतकऱ्यांचे आंदोलन चालले; परंतु या आंदोलनात शेकडो लोक मारले जातील,याची अधिकाऱ्यांना आधीच कल्पना होती.या सरकारने हे षडयंत्र आधीच रचले होते.या देशातून शेतकरीच हद्दपार करण्याचे षडयंत्र आहे.त्यासाठीच तीन कृषी कायदे आणले.या देशातील संपत्ती केवळ पाच-दहा लोकांच्या हातात राहावी व इतर केवळ जिवंत

राहावेत,असे हे षडयंत्र आहे.या देशातील शेती आणि येणारी पिढी वाचवण्यासाठी आंदोलना शिवाय पर्याय नाही.आमचे आंदोलन हे समतेचे आंदोलन आहे,त्यात प्रत्येकाने सहभागी व्हावे,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

केंद्रातील भाजपच्या सरकारसह "आरएसएस'ला मानव, शेती, व्यापाऱ्यांशी देणेघेणे नाही. त्यांचा देशातील ४० टक्के जागांवर डोळा आहे. जागा कापीरेटच्या हाती देऊन तेथे उद्योग वा शेती करून येथील लोकांना कामगार बनवायची होती. भारतात मजुरी कमी असणेही त्याला कारण आहे. सध्या संपूर्ण मीडियावर सरकार व "आरएसएस'चे नियंत्रण आहे.

दिल्लीत आंदोलनातही ते दिसले. त्यामुळे विरोधकांना प्रश्नही ठरवून विचारले जातात. देश, शेतकरी, कष्टकऱ्यांना वाचवण्यासाठी सगळ्यांना तीव्र आंदोलनासाठी तयार रहावे लागणार असल्याचेही टिकैत म्हणाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वीज यंत्रणेच्या खासगीकरणाच्या विरोधातील वीज कर्मचाऱ्यांच्या आंदोलनासह स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनालाही समर्थन घोषीत केले.

## तर आत्महत्या नको संघटित व्हा

### शेतकऱ्यांना सक्षम होऊ दिले जात नाही-केदार

**कोरोनाकाळात उद्योगापासून तर नोकरीचे सर्व सेक्टर बंद होते. शेतकरी मात्र शेतात राबत होता. यानंतरही या देशातील सत्याधाऱ्याची नजर शेतकऱ्याकडे वळली नाही. देश स्वातंत्र्य झाला त्यावेळी ३४ कोटी लोकसंख्या होती. आज १४० कोटी लोकसंख्येचा पोशिंदा ठरत असतानाही शेतकरी आत्महत्या करतो. हे यजा देशाचे दुर्भाग्य आहे. असे सांगत मागणी नसताना ५२ हजार कोटी खर्चून अर्धवट समृद्धी महामार्ग तयार केला. मात्र शेतकऱ्याला सक्षम होऊ दिले जात नाही. अशी टीका सुनील केदार यांनी केली.**

### तर त्यांनी ऑनलाईन शिक्षणावरही प्रतिबंध लावला असता

**दिल्लीतील आंदोलनादरम्यान करोनामुळे सर्वत्र ऑनलाईन शिक्षण सुरू होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मोबाईल तंत्रज्ञान जास्त कळत नसले तरी त्यांची मुले शिकताना अधूनमधून आंदोलनाच्या घडामोडी सांगायचे. त्यामुळे आंदोलनात ऑनलाईन शिक्षणाचा फायदा होत असल्याचे भाजप-ङ्गआरएसएसफ्ला तेव्हा कळले असते तर त्यांनी या शिक्षणावरही प्रतिबंध घातले असते. महाराष्ट्रात आंदोलनाच्या मजबुतीसाठी कुणीही कार्यक्रम घेतल्यास मी किंवा आमचे नेते येतील. येथील शेतकऱ्यांनी सर्वत्र संयुक्त मोर्चा समिती बनवावे असे आवाहन केले.सोबतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातेवाईक या राज्यात राहत असल्याने त्यांना सर्व कार्यक्रमात सामावून घेण्यात यावे आणि त्यांनी देशपातळीवर पुढे यायला हवे असे म्हणाले.**

# अनियंत्रीत वाहतुकीमुळे अपघाताची शक्यता




**गोंदिया:-** जिल्ह्यात पसरलेले रस्त्यांचे जाळे, हलक्या व जड वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, वाहतूक नियमांचे सर्रास होणारे उल्लंघन, रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीत होणारी हयगय आदी कारणांमुळे होणाऱ्या अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस प्रचंड वाढ होत आहे. परिणामी, जीवित व वित्तीय हानी होत असल्याने त्याच्या परिणामांना समाजाला नेहमीच सामोरे जावे लागते. यावर लगाम लावण्याचे उद्देशाने जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात सर्व्हेक्षण करण्यात आले.

या सर्व्हेक्षणातून अपघाताला कारणीभूत बाबी आणि अपघातांच्या संख्येत घट करण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. या अहवालाची दखल शासनाने घेतल्यास नागरिकांच्या होणाऱ्या नुकसानीवर निश्चित ब्रेक लावता येईल, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

गोंदिया जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र ६, देवरी गोंदिया राज्यमार्ग, कोहमारा गोंदिया राज्यमार्ग, तिरोडा गोंदिया, गोंदिया बालाघाट राज्यमार्गासह इतरही भागात रस्त्यांचे फार मोठे जाळे पसरले आहे. या मार्गावरील वाहतुकीसंदर्भात अनेक अडथळे आहेत. कोठे रस्त्यांची अवस्था खराब आहे, तर कोठे वाहतुकीचे नियम आणि धोकादायक ठिकाण दर्शविणारे फलकच गायब आहेत. त्याशिवाय वाहनांची पार्किंग ही एक मोठी समस्या आहे. वाट्टेल त्या ठिकाणी वाहन ठेवले जात असल्याने वाहतुकीस अडथळा निमाण होतो. याची परिणती अपघातात होऊन अनेक जणांना आपले प्राण रस्ता अपघातात गमवावे वागले तर कित्येकांना अपंगत्व येऊन त्यांचे आयुष्य उद्धस्त झाले. यात मोठ्या प्रमाणावर वित्तीय हानीसुद्धा बाधितांना सोसावी लागली. त्याशिवाय पोलिस विभागावर अशा अपघाताच्या चौकशीचा ताण पडतो तो वेगळाच. अशा अपघातांमुळे पोलिसांनाही इतर गुन्ह्याच्या तपासात अडचणींचा सामना करावा लागतो.

गेल्या जून महिन्यापर्यंत लोटलेल्या साडेपाच वर्षात एकट्या गोंदिया जिल्ह्यातील अपघातांच्या आकडेवारीवर नजर टाकली थक्क करणारी असून राष्ट्रीय स्तर व राज्यस्तरावर होणाऱ्या अपघातांच्या सरासरीपेक्षा खूप मोठी आहे. अपघातांमुळे होणारी जीवित हानी ही अन्य कारणांमुळे होणाऱ्या जीवितहानीपेक्षा कितीतरी पटीने मोठी आहे, ही खरी चिंतेची बाब आहे.

वाहतूक विभागाने जिल्ह्यातील परिस्थितीचा अभ्यास करून तयार करण्यात आलेल्या अहवालात या अपघातांची कारणमीमांसा मांडली आहे. ग्रामीण भागात होणाऱ्या अपघातामध्ये प्रामुख्याने रस्त्यांचे उतारावर वाहनांची गती नियंत्रित करणारे गतिरोधकांचा अभाव, जोडरस्ते व गर्दीच्या भागात गतिरोधकांचा अभाव, अपघात प्रवणस्थळांची माहिती देणाऱ्या फलकांचा अभाव,रेडीयम सिग्नल वा पट्ट्याचा कमी वापर,काटकोनात असणारे जोडरस्ते, गावातून जाणाऱ्या प्रमुख रस्त्याला सर्विस रस्ता नसणे, जोडरस्त्याच्या ठिकाणी प्रकाशाचा अभाव, वळणरस्त्यावर चुकीच्या ठिकाणी होणारी वाहनांची पार्किंग, मोकाट जनावरे,वळणरस्ता आणि जोडरस्त्याच्या ठिकाणी असलेली झाडे-झुडपे, रस्त्याशेजारी असलेली झाडे व पुलांवर रेडीयमच्या पट्ट्या नसणे, रस्त्यांवरील खड्ड्यांची वेळेत न होणारी डागडुजी आदी प्रमुख कारणे आहेत.



शहरी भागांत होणाऱ्या अपघातांची कारणमीमांसा नमूद करताना रस्त्यांवरील अतिक्रमणे या मुख्य समस्येवर प्रकाश टाकण्यात आला आहे. याशिवाय चौक परिसरात हायमास्ट नसणे, झेब्रा पट्ट्या नसणे, मोकाट जनावरांसाठी कोंडवाड्यांची कमतरता,वाहनांची अयोग्य ठिकाणी होणारी पार्किंग, रस्त्यावरील विद्युत खांब आणि बसविण्यात आलेले रोहित्र, माहितीदर्शक फलकांचा अभाव, वाहतुकीस अडथळा करणारी झाडे, जाहिरातींचे मोठमोठे होर्डिंग्ज, पादचारी पट्ट्यांचा अभाव, वर्दळीच्या चौकात गतिरोधक नसणे, रेडीयम पट्ट्यांचा कमी वापर यामुळे शहरी भागात अपघात होत असतात. यामुळे गोंदियासह जिल्ह्यातील इतरही शहरातील अशा अपघातप्रवण स्थळे या वाहतूक पथकाने अधोरेखित करून त्यांची नोंद आपल्या अहवालात केली आहे.

गोंदिया शहराचा विचार करता खासगी प्रवासी वाहनांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज फुलचूर,मामा चौक सिव्हिल लाइन, बीजीडब्ल्यू दवाखानाजवळील सेतू कार्यालय, मरारटोली बसस्थानकाजवळ दुबे मेडीकलच्या बाजूला, कुडवा नाक्यावरील चौकाच्या डावीकडील टर्निंग, जयस्तंभ चौकातील एसडीपीओ कार्यालय बाजूला अशा सात ते आठ ठिकाणी ऑटो, काळी-पिवळी या खासगी प्रवासी वाहनांकरिता वाहनतळ निश्चित केले आहेत.

# शहराचा विकास हेच राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्राथमिक ध्येय-माजी आमदार राजेन्द्र जैन



**गोंदिया:** आगामी गोंदिया शहर नगरपरिषदेची निवडणुक राष्ट्रवादी कॉँग्रेस पाटी सर्व ताकतीने लढेल. गोंदिया शहरातील रस्त्यांची समस्या, शहरांतील स्ट्रीट लाईट ची समस्या, नगर परिषदेच्या नियोजन शून्य व्यवस्थापनामुळे अनेक ठिकाणी कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. वाहतूकीची समस्या, शहरातील उद्यान, नगरपरिषदेच्या शाळांचा दर्जा या सारख्या सोयी सुविधाचा अभाव अश्या अनेक समस्यांनी गोंदिया शहराला ग्रासले आहे. त्यामुळे नगर परिषदेत राष्ट्रवादी कॉँग्रेस पाटी च्या हातात जनतेने सत्ता दिल्यास गोंदिया शहर विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम प्राधान्याने करू असे प्रतिपादन माजी आमदार राजेन्द्र जैन यांनी केले.

गोंदिया शहरातील प्रभाग क्र.१३ राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक परमात्मा नगर येथे श्रीमती उमासिंग ठाकूर यांच्या निवास स्थानी माजी आमदार राजेन्द्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी माजी आमदार राजेन्द्र जैन यांनी प्रभागातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यासोबत विविध समस्यांवर सविस्तर चर्चा केली.

माजी आमदार राजेन्द्र जैन पुढे म्हणाले की सर्व सामान्य जनतेला च्या समस्या मागी लावून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे पक्षाचे ध्येय धोरण आहे. खासदार प्रफुल पटेल यांच्या माध्यमातून या शहराचा विकास करणे, गोंदिया शहरातील अनेक समस्या मार्गी लावून विकासाच्या प्रवाहात आणणे हाच राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचा मुख्य उद्देश आहे असे प्रतिपादन माजी आमदार राजेन्द्र जैन यांनी केले.यावेळी माजी आमदार राजेन्द्र जैन यांच्या सोबत सर्वश्री अशोक सहारे, रफीक खान, नागो बन्सोड, जुनेद शेख, इकबाल सय्यद, रौनक ठाकूर, रजत चौहान, जितेंद्र कडवे, रवि उके,नसीमा आशीफ शेख, शुभदा कुरंजेकर, प्रीती, कविता पाण्डे, मंदा गौतम, कमलाबाई, कल्पना बन्सोड, ज्योति भालाधरे, अरुणा मेश्राम, अनू सुखदेवे, प्रमिला मेश्राम सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# एमआय पटेल हायस्कुलच्या विद्यार्थ्यांना जि.प.अध्यक्षांच्या हस्ते सायकल वितरण



**गोरगाव:** तालुक्यातील एम.आय.पटेल हायस्कुल व ज्यु.कॉलेज सोनी येथे मानव विकास कार्यक्रम अंतर्गत १३० शालेय विद्याथीनींना सायकलचे वितरण जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे विशाल शेंडे,संस्था उपाध्यक्ष डॉ.के.आर.शेंडे, से.नि. प्राचार्य व्हि.टी.पटले, श्रीमती हेमश्वरीताई हरिनखेडे सरपंच, श्रीमती आशाताई बोपचे, सुरेश टेभरे, खिलेश्वरीताई पटले, चेतनाताई पटले, सोनी शाळेचे प्राचार्य जे.एम.बागडे, एस.एस.शहारे प्राचार्य गिधाडी, व्हीकुमार पटले, टी.जी.कोडापे, प्रा.डि.एस.बिसेन, पी.डि. शेंडे से.नि. लिपिक तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कार्मचारी, पालक व सर्व विद्यार्थांच्या उपस्थीतीत हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाचे संचालन पी. एस. राठोड तर आभार प्रा.डि.सी.कटरे यांनी केले.

### वनरक्षकाला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण,तीन आरोपीवर गुन्हा दाखल

**गोंदिया:-**रेतीचा ट्रॅक्टर अडविल्याचा राग मनात धरून वनरक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांना धक्काबुक्की व कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केली.ही घटना बंध्या ते खोळदा पांदण रस्त्यावर बुधवारी सकाळी घडली.या प्रकरणी अर्जुनी मोरगाव पोलिसांनी तीन आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.वनरक्षक सचिन पुरुषोत्तम गावंडे व त्यांचे सहकारी कर्मचारी सचिन अभिमन मेश्राम,दीपक बुद्धू सापा व लहानू सखाराम नैताम हे बुधवारी सकाळी १०७२(ए) खोळदा बिटमधील बंध्या ते खोळदा पांदण रस्त्यावर गस्तीवर होते.गोपीनाथ देशमुख व लक्ष्मण देशमुख यांनी रेतीचा ट्रॅक्टर अडविल्याचा राग मनात धरून वनरक्षकांच्या सहकाऱ्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली.वनरक्षकाला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केली.सुमारे एक ब्रास रेतीची चोरी केली.आरोपींनी शासकीय कर्तव्यात अडथळा आणल्याने महागावचे वनरक्षक सचिन गावंडे (डे ३३) यांनी स्थानिक पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली.त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी गोपीनाथ दौलत देशमुख (५५),लक्ष्मण गोपीनाथ देशमुख (३०) व रणवीर नगरधने (४०) तिन्ही रा महागाव याचेविरुद्ध कलम ३५३,३३२,१८६,३७९,३४ भादंवीचा गुन्हा दाखल केला आहे.

# अनुकंपाधारकांची भरती करा

## आमदार विजय रहांगडाले यांची उपमुख्यंत्र्याकडे मागणी



**तिरोडा:** अनुकंपा भरती शासन निर्णयानुसार २० टक्के व जानेवारी ते फेब्रुवारीच्या आत व्हावी. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात अनुकंपाधारकांची भरती घेण्यात यावी, अशी मागणी आमदार विजय रहांगडाले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

७५ व्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभुमीवर आज महाराष्ट्रात सरळ सेवा भरतीच्या अनुसंघाने ७५ हजार जागा भरण्याचा निर्णय शासनाने केला आहे. तरी त्यात सरळ सेवा कोट्यातील प्रति वर्ष रिक्त होणाऱ्या पदाच्या २० टक्के पदे अनुकंपा तत्वावर भरावयाची संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आली. त्यावर अधिक भर देऊन अनुकंपा धारकांना लवकरात लवकर त्यांचा हक क मिळवून द्यावा. कारण शसकीय सेवेत असताना कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्यांचा कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबास बाहेर काढण्याकरिता आणि आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी संबंधित मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकनपा सहानुभुती म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात यावी. अनुकंपा नियुक्तीचे सदर प्रयोजन विचार घेता अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यावी. तथापी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज केल्यानंतर नियुक्ती मिळण्यास काही वर्षाचा कालावधी लागत असतो. अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षा सुचित प्रलंबित उमेदवारांची संख्या व त्याची वयोमर्यादा दिवसेंदिवस वाढत आहे. कोविड १९ च्या पार्श्वभुमीवर अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार तातडीने रोजगार उपलब्ध करुन दिल्यास या योजनेचा उद्देश साध्य होईल. ही बाब विचारात घेऊन अनुकंपा नियुक्तीच्या कार्य पद्धतीबाबत असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी. तसेच २०२१ ची भरती प्रक्रिया संपुष्टात आली असून नवीन यादी प्रकाशित करुन २०२२ च्या भरती प्रक्रियेला सुरुवात करावी. गोंदिया जिल्हा परिषदेला जवळपास १८० च्यावर अंनुकंपाधारक नियुक्तीची वाट बघत असून त्यांना लवकरात लवकर योग्य ती प्रक्रिया पार पाडून अनुकंपा भरती ही तातडीने व्हावी म्हणून दोन-तीनशे परिवाराडे लक्ष देवन गोंदिया जिल्हा परिषदेची अनुकंपा परभरती लवकरात लवकर घेण्यात यावी अशी मागणीचे निवेदन मुख्यमंत्र्यांना आमदार रहांगडाले यांनी दिले. यावेळी अनुकंपा संघर्ष समिती अध्यक्ष अतुलकुमार भरणे, उपाध्यक्ष दुर्गाप्रसाद बघेले, श्रीकांत मेश्राम, सुजीत सूर्यवंशी, यश राऊत उपस्थित होते.

### दैनदिन जीवन कसे जगावे

बहुतांश जिल्ह्यात अनुकंपा भरती व नवीन यादी प्रकाशित झाली असून गोंदिया जिल्ह्याची भरती प्रक्रिया मागे का असे अनेक प्रकारचे विचार अनुकंपा धारकांच्या मनावर येत आहेत. घरी शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास दैनंदिन जीवन कसे जगावे, लहान मुल,बाळ असले की त्यांच्या संगोपन कोणत्या माध्यमातून करावा असे अनेक प्रशचन अनुकंपा धारकांपुढे आवासून उभे आहेत.

### नोकरीही नाही अन् पेंशनची नाही

२००५ नंतर ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालाी अशा कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर पेंशन सुद्धा लागू झाली नाही. अशा परिवाराला अनुकंपा सारखी गरज भासते. परंतु भरती प्रक्रिया अतिशय संथगतीने होत असल्यामुळे अनुकंपा धारकांच्या जीवनशैलीवर याचे विपरित परिणाम पडत असल्यचे चित्र आहे.

# आमगाव मित्र परिवारातर्फे 'एक दौड भारत के नाम' चे आयोजन



**आमगाव:** भारतीय सैन्य दिवसाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त आमगाव मित्र परिवार यांच्या वतीने एक दौड भारत के नाम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत शेकडोच्या संख्येने ज्येष्ठ नागरिक, युवक व युवती सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे संयोजक संतोष दुबे, यशवंत मानकर, अजय खेतान, भोला गुप्ता यांच्या उपस्थितीत भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून व राष्ट्रपिता महात्मा गांधी याना माल्यार्पण करून द्विप प्रज्वलित करून करण्यात आली.

दौड स्पर्धेची सुरुवात सेवानवृत्त सैनिक यांच्या हस्ते हिरवी झंडी दाखवून गांधी चौकातून करण्यात आली. दौड स्पर्धेत १६ ते ३० वर्ष वयोगटातील प्रथम पुरस्कार विजय रोशन चुटे, द्वितीय पुरस्कार एकनाथ प्रकाश हत्तीमारे, तिसरा पुरस्कार कुणाल बब्बीकुमार गायधने यांनी पटकाविला.

३० ते ५० वर्षे वयोगटात प्रथम कमांक संजय मंगरूलाल मक्षिरके, द्वितीय आसिफ लतीफ कुरेशी, तिसरा कमांक नरेंद्र तुलसीदास दसरिया यांनी पटकाविला. ५० वर्षे पेक्षा जास्त वयोगटातील दौड स्पर्धेत प्रथम कमांक श्रीचंद चौधरी, दुसरा कमांक परमेश्वर महारवाडे व तिसरा कमांक माणिकलाल धुर्वे यांनी पटकावले.

महिला वर्ग दौड स्पर्धेत अनिशा राधेश्याम रहिले प्रथम, हर्षा अतोष रहांगडाले द्वितीय व रिया चंद्रकांत शिंगाडे यांनी तिसरा कमांक पटकावला. विजयी स्पर्धकांना जयप्रकाश शिवणकर, संजय बहेकार, योगेश असाटी, हरिहर मानकर, सुभाष पांडे, डॉ. श्रीकांत राणा, सोनू मेंढे, आशिष माहेश्वरी, विष्णू अग्रवाल, पंकज असाटी, मोना जैन, शंभुदयाल अग्रिका, अमोल कोठारी, अभिषेक माहेश्वरी, मनीष असाटी, जयश्री पुंडकर यांच्या हस्ते रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रसंगी भारतीय लष्करातील सेवानवृत्त सैनिक यांचा सन्मान समाजसेवी प्रमोद कटकवार, डॉ. लिलाधर कलंत्री, डॉ. साजिद खान, डॉ. श्रीकांत राणा यांनी पुष्प-गुच्छ, शाल व श्रीफळ देऊन केला. कार्यक्रमाचे संचालन करुन आभार यशवंत मानकर, अजय खेतान यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय बाहेकर, रितेश चुटे, राजीव फुंडे, हर्षल मानकर, समीर सरकार, विकास शर्मा, आनंद शर्मा, पंकज असाटी, बाळाराम व्यास, हेमंत चावके, उत्तम नंदेश्वर, विश्वास चौहान, अतुल चौहान, अमित हेमने, प्रशांत मेंढे, गज्जू फुंडे तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्र व पोलिस विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# ग्राम विकासासाठीसाठी सहकार्य करणार-आमदार नानाभाऊ पटोले



**अर्जुनी मोरगाव :** ग्रामविकास युवा परिवर्तन मंच इटखेडाचे सरपंच व सर्व नऊ सदस्य प्रचंड मताने निवडून आले. आज माझ्या हस्ते त्यांचा सत्कार होत आहे. हि माझ्यासाठी अभिमानाची बाब असून मी या इटखेडा गावाच्या विकासासाठी सदैव सहकार्य करणार. शिव छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा सुद्धा देणार असल्याचे प्रतिपादन आमदार नानाभाऊ पटोले यांनी केले.

इटखेडा येथे सरपंच, उपसरपंच व सदस्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांचे हस्ते व आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे, गोंदिया जि.प. चे उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर, कांग्रेस तालुकाध्यक्ष प.स. सदस्य घनशाम धामट, जि.प.सदस्य पोर्निमाताई ढेंगे, श्रीकांत घाटबांधे, प.स.सदस्य भाग्यश्री सयाम, जिल्हा उपाध्यक्ष भागवत नाकाडे, प्रमोद लांजेवार, राकेश जयस्वाल, आर.के. जांभूळकर, विकास लांडगे, उद्धव मेहंदळे, इंद्रदास झिलपे, सुभाष देशमुख, गजानन नाकतोडे, राजू पालीवाल, इटखेडा येथील सरपंच आशाताई झिलपे व इतर मान्यवरांचे उपस्थितीत करण्यात आले होते.

नानाभाऊ पटोले याप्रसंगी म्हणाले कि, इटखेड्यासी माझे आतापर्यंत प्रेमसंबंध जुळेले आहे ते कायम ठेवणार. शिव छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा देणार असल्याचे सांगितले. आज सामान्य जनता महागाईत होरपडली जात आहे. शेतकरी, कष्टकरी जनतेच्या विरोधात विद्यमान शासन असून धनाचा बोनस सुद्धा शासनाने अद्याप दिलेला नाही. जनता भाजपला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले. आमदार चंद्रिकापुरे म्हणाले कि, परिवर्तन मंच ने खरोखर गावात काही दिवसातच परिवर्तनाची चुणूक दाखवली, गावाचे सौंदर्य खुलविले. ग्रामविकासासाठी निश्चितच सहकार्य करणार.

सरपंच आशाताई झिलपे यांचा वाढदिवस, संक्रातीचा गोडवा अन त्यात सत्कार सोहळ्याचे आयोजन प्रशंसनीय असल्याचे ते म्हणाले. यावेळी जि.प. उपाध्यक्ष यशवंत गणवीर म्हणाले कि, ग्रामपंचायत ने केलेल्या विकास कामाला जिल्हा परिषद निश्चीतच सहकार्य करणार असल्याचे सांगितले. लोकपाल गहाणे यांनी परस्परातील हेवेदावे लोकप्रतिनिधीनी तिळगुळ खाऊन बाजूला ठेवावे असे म्हणाले. दिलीपभाऊ बन्सोड, भाग्यश्री सयाम, राकेश जयस्वाल, व इतरांनी यावेळी मार्गदर्शन केले.

शिवछत्रपती चौक ग्रामपंचायत परिसरात सत्कार सोहळ्याचे निमित्य साधून बहावा, आपटा, बकुळाचे वृक्षारोपण आ. चंद्रिकापुरे, इंजि. यशवंत गणवीर, नवनिर्वाचित पदाधिकारी व ग्रामस्थ यांचे उपस्थितीत करण्यात आले. आजच्या सोहळ्याचे साक्ष मानून या झाडाचे संगोपन करावे असे आ. चंद्रिकापुरे म्हणाले.

नवनिर्वाचित सरपंच आशाताई झिलपे उपसरपंच आशीर्वाद लांडगे, ग्रा.प. सदस्य संजय कांबळी, रमेश कुंभरे, सचिन लांजेवार, वर्षा कावळे, छाया धांडे, उज्वला गोंडाणे, छाया लोणारे, सिमा कोटरंगे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जेष्ठ नागरिक गोविंदा मेहंदळे, नारायण राउत, माणिक गडपाल, हरिदास प्रधान, अर्जुन कोरचे यांचासुद्धा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक ग्रामविकास युवा परिवर्तन मंच चे उद्धव मेहंदळे, संचालन मोरेश्वर मिसार, आभार इंद्रास झिलपे यांनी मानले